महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 25536712 (OFF)

E-MAIL -sscboardpune@gmail.com

**तातडीचे**

क.पुविमं/यो.प्र./2026/ 8903
पुणे – 411005
दिनांक– 28/08/2026

प्रति,
प्राचार्य/मुख्याध्यापक
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये
पुणे/अहिल्यानगर/सोलापूर

**विषय :– योग्यता प्रमाणपत्राबाबत सूचना..**

**संदर्भ –** 1. राज्यमंडळ कार्यालय,पुणे यांचे पत्र–क.रा.मं./संशोधन/3337 दि.23/08/2024.
2. राज्यमंडळ कार्यालय,पुणे यांचे पत्र –क.रा.मं./संशोधन/295 दि. 23/01/2025.
3. राज्यमंडळ कार्यालय,पुणे यांचे पत्र – क.रा.मं./संशोधन/3386 दि. 03/10/2025.
4. या कार्यालयाचे पत्र– क.पुविमं/यो.प्र./2025/8238 दि.13/10/2025.
5. राज्यमंडळ कार्यालय,पुणे यांचे पत्र–क.रा.मं./संशोधन/समकक्षता/3516दि.19/08/2026.

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरून या कार्यालयाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, **सन 2026 –27** साठी इ. 11 वी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र अर्ज ऑनलाईन **शुल्कामध्ये तसेच तारखांमध्ये** कोणताही बदल करण्यात आलेला नाही. तरी खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे **योग्यता प्रमाणपत्र शुल्काचा भरणा** करण्यात यावा.

| अ. क. | विवरण | ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे शुल्क |
|---|---|---|
| 1 | **भारतीय विद्यार्थी – नियमित शुल्कासह योग्यता प्रमाणपत्र अर्ज स्वीकारणे** (दि. 1 सप्टेंबर ते दि. 30 सप्टेंबर पर्यंत) | रू. 1000/– |
| 2 | **परदेशी विद्यार्थी – नियमित शुल्कासह योग्यता प्रमाणपत्र अर्ज स्वीकारणे** (दि. 1 सप्टेंबर ते दि. 30 सप्टेंबर पर्यंत) | रू. 1500/– |
| 3 | **भारतीय विद्यार्थी – योग्यता प्रमाणपत्राचे विलंब शुल्क** (दि. 1 ऑक्टोंबर ते दि. 30 नोव्हेंबर पर्यंत) | रू. 1000+100 =1100/– |
| 4 | **परदेशी विद्यार्थी – योग्यता प्रमाणपत्राचे विलंब शुल्क** (दि. 1 ऑक्टोंबर ते दि. 30 नोव्हेंबर पर्यंत) | रू. 1500+100 =1600/– |
| 5 | **भारतीय विद्यार्थी** योग्यता प्रमाणपत्राचे अतिविलंब शुल्क दि. 1 डिसेंबर पासून योग्यता प्रमाणपत्र अर्ज विभागीय मंडळास सादर करण्यात आलेल्या दिनांकापर्यंत | रू.1000+100 + प्रतिदिन प्रतिविद्यार्थी रू.20/– |
| 6 | **परदेशी विद्यार्थी** योग्यता प्रमाणपत्राचे अतिविलंब शुल्क दि. 1 डिसेंबर पासून योग्यता प्रमाणपत्र अर्ज विभागीय मंडळास सादर करण्यात आलेल्या दिनांकापर्यंत | रू.1500+100 + प्रतिदिन प्रतिविद्यार्थी रू.20/– |

तसेच CBSE व ICSE बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्राबाबत संदर्भिय क्र. 3 च्या पत्रा अन्वये कळविण्यात आले होते. तरी CBSE व ICSE बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्राबाबत संदर्भिय क्र. 3 क.रा.मं./संशोधन/3386 दि.03/10/2025 व संदर्भिय क्र. 4 या कार्यालयाचे पत्र क.पुविमं/यो.प्र./2025/8238 दि.13/10/2025 रोजीच्या पत्रानुसार कार्यवाही करण्यात यावी. कोणताही विद्यार्थी योग्यता प्रमाणपत्र घेण्यापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

MBRaut
(डॉ.मीनाक्षी राऊत)
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ ,पुणे